# मराठा समाजाचे आरक्षण योग्यच

## न्यायालयात प्रतिज्ञापत्र : राज्य सरकार भूमिकेवर ठाम

**मुंबई :** आजही ८० ते ८६ टक्के मराठा समाज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असल्याचा निष्कर्ष बापट, राणे आणि नुकतेच पुण्याच्या गोखले रिसर्च इन्स्टिट्युटने काढला आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देण्याचा राज्य सरकारचा निर्णय योग्यच आहे, असे राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाने प्रतिज्ञापत्राद्वारे उच्च न्यायालयाला सांगितले आहे. मराठा आरक्षणासंदर्भात सोमवारी राज्य सरकारने उच्च न्यायालयात सुमारे २५०० पानांचे प्रतिज्ञापत्र सादर केले.

आघाडी सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आणि तसा वटहुकूम जारी केला. या वटहुकूमाला समाजिक कार्यकर्ते केतन तिरोडकर व अनेक सामाजिक संघटनांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. तर या निर्णयाचे समर्थन करणाऱ्या अनेक याचिकाही उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. गेल्या महिन्यात उच्च न्यायालयाने राज्य सरकारला त्यांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सोमवारी मुख्य सरकारी वकील अभिनंदन वग्यानी यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले. (पान १० वर)

### गोखले इन्स्टिट्यूटचे सर्वेक्षण

- राज्य सरकारच्या समितीचा अहवाल व याचिका दाखल करण्यात आल्यानंतर राज्य सरकारने नव्याने मराठा समाजाची स्थिती पाहण्यासाठी पुण्याच्या गोखले रिसर्च इन्स्टिट्यूटला जिल्हानिहाय सर्वेक्षण करण्यास सांगितले होते.
- इन्स्टिट्यूटनेही सध्याच्या स्थितीला ८० ते ८६ टक्के मराठा समाज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असल्याचा निष्कर्ष काढला आहे. समाजातील बहुतांश लोक शेती करत असून अन्य छोटे उद्योग करत असल्याचे गोखले इन्स्टिट्युटने अहवालात म्हटल्याचे सामाजिक न्याय विभागाने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.